# वसई विरार शहर महानगरपालिका

**मा. स्थायी समिती सभा दिनांक 26/07/2019**

**सभा सुचना क्रं. 07**

| अ क्र. | विषयाचे नाव | स्थायी समिती सभेचा निर्णय |
|---|---|---|
| 1. | **वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती एच मधील वॉर्ड क्र. 95 मध्ये खलाटीपाडा येथे सुर्यास्त उद्यान विकसित करणे कामाचे अंदाजपत्रकीय रक्कमेस प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळणेबाबत.** | **ठराव :-** वरीलप्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होऊन प्रभाग समिती एच मधील वॉर्ड क्र.95 मध्ये खलाटीपाडा येथे सुर्यास्त उद्यान विकसित करणे कामाचे रक्कम रु.29,43,333/- चे अंदाजपत्रकीय रक्कमेस प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देण्यात येत आहे. सदरचे कामाचे अंदाजपत्रकास तांत्रिक मंजुरी घेऊन निविदाची कार्यवाही/वर्तमान पत्रात जाहीर निविदा सुचना प्रसिध्दी करणेस त्या अनुषंगाने होणाऱ्या खर्चास हि सभा मंजुरी देत आहे.<br><br>**अनुमोदक :- मा.श्री. कल्पेश मानकर सूचक :- मा.श्री. नितीन राऊत**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 2. | **वसई विरार शहर महानगरपालिका, प्रभाग समिती सी (चंदनसार) हद्दीतील उद्याने सुशोभिकरण करणे.** | **ठराव :-उपरोक्त** प्रस्तावावर सभेत सविस्तर चर्चा करण्यात आली. सभेमध्ये झालेल्या चर्चेनुसार प्रभाग समिती सी (चंदनसार) कार्यक्षेत्रामधील प्रस्तावात नमुद एकुण 8 उद्याने सुशोभिकरण करणेकामी होणाऱ्या रक्कम रु.56,93,334/- (अक्षरी छप्पन लक्ष त्र्याण्णव हजार तिनशे चौतीस रु.मात्र/-) इतक्या अंदाजपत्रकीय खर्चास ही सभा सर्वानुमते प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. किशोर पाटील सूचक :- मा.श्री. पंकज ठाकूर**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 3. | **प्रभाग समिती आय कार्यालय क्षेत्रातील वॉर्ड क्र.112 मधील दत्तधाम दफनभुमी पाथवे बांधणे व इतर अनुषंगीक कामे करणेकामी आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत.** | **ठराव :-** वरील विषयाबाबत सभागृहात सविस्तर चर्चा करणेत आली. वरील कामी तयार करणेत आलेल्या रु.17,13,825/- इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास ही सभा प्रशासकिय व वित्तीय मंजूरी देत आहे. त्यानुसार सदर कामाचे अंदाजपत्रकास आवश्यक तांत्रिक मंजूरी घेवुन निविदेची कार्यवाही करणेस, मा.आयुक्त ह्यांनी मा.स्थायी समितीपुढे शिफारस केली आहे. तसेच त्याकामी अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगीक खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम. दिक्षा घरत सूचक :- मा.श्री. नितीन राऊत**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |

| | | |
|---|---|---|
| 4. | **<u>वसई विरार शहर महानगरपालिकेचे वातानुकुल यंत्र, वॉटर कुलर तसेच शवागृहातील शवपेटया यांची सन 2018 -19, 2019-20 व 2020-21 या तीन वर्षाकरीता देखभाल व दुरुस्ती करणे व आवश्यक स्पेअर पार्ट साहित्य फिटींग करणे कामाच्या लघुत्तम निविदाधारकासोबत संविदा करणेबाबत.</u>** | **ठराव** :- सदर विषयाबाबत सभागृहात सविस्तर चर्चा करण्यात आली असता असा निर्णय घेण्यात आला आहे की, प्राप्त निविदांपैकी मे.एरियांझ यांचे भाग-1 त्रैवार्षिक देखभाल दुरुस्ती कामामधील अनुक्रमांक 1 व 2, भाग-2 मधील अनुक्रमांक 1,3 ते 11 बाबींचे योग्य व वाजवी दर मंजुर करुन भाग 1 मधील अनुक्रमांक 3 चे प्राप्त अवाजवी दर नामंजुर करणेत येत आहे. सन 2016-17 वर्षातील वातानुकुल यंत्रणा, वॉटर कुलर तसेच शवगृहातील शवपेट्या यांचे आवश्यक स्पेअर पार्ट, साहित्य सह देखभाल दुरुस्ती करणे कामास सदर निविदेची कार्यवाही पुर्ण होईपर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. तसेच सन 2018-19 हे वित्तीय वर्ष संपुष्टात आल्याने सन 2019-20 व सन 2020-21 या वित्तीय वर्षाकरिता वातानुकुल यंत्रणा यांची देखभाल दुरुस्ती करणे व आवश्यक स्पेअरपार्ट साहित्य फिटींग करणे कामी कमी दराचे निविदाकार मे.एरियांझ यांचेसोबत संविदा करणेंस व याकामी येणाऱ्या खर्चास हि सभा प्रशासकिय व वित्तीय मान्यता देत आहे.<br><br>**अनुमोदक :- मा.श्रीम. किशोर पाटील सूचक :- मा.श्री. कल्पेश मानकर**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |

**नगरसचिव**
**वसई विरार शहर महानगरपालिका**